**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol. 6 No. 40** **September - October - 2025**

# आदिवासी समाजाच्या कृषीपूरक लघु –कुटीर उद्योग विषयक आर्थिक समस्या : कारणे व उपाय

**श्री. नेटके दत्तात्रय एकनाथराव**
*सौ. के. एस. के. महाविद्यालय, बीड*
*Corresponding Author – श्री. नेटके दत्तात्रय एकनाथराव*
**DOI - 10.5281/zenodo.17662246**

**प्रस्तावना :**

भारत हा खंडप्राय देश असून त्यामध्ये प्रचंड विविधता असलेला देश आहे. या विविधतेत आदिवासी समुदायाचे स्थान खूपच महत्त्वाचं आहे. "आदिवासी" आर्थात 'मूळनिवासी' म्हणून त्यांचा इतिहास, त्यांची संस्कृती, त्यांची परंपरा व त्यांचे जीवन हे सदैव निसर्गाशी निगडीत म्हणजेच निसर्गाला कायम जोडलेले आहे. आदिवासी समाज हा प्राचीन कालखांडापासून जंगलात, डोंगर-दऱ्यात आणि नद्यांच्या सहवासात राहिलेला असून त्यांची स्वतंत्र संस्कृती निर्माण करून जपणूक केलेली आहे. आदिवासी समाज हा मुळ भारतीय असून सुद्धा सर्वच बाबतीत खूप मागास राहिलेला आहे. त्याची कारण मीमांसा प्रस्तुत संशोधनात मांडण्याचा प्रयत्न आहे.

**आदिवासी समाज म्हणजे काय ?**

आदिवासी समाज म्हणजे आसा समाज की,जो भारतातील आणि जगभरातील वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये प्राचीन काळापासून राहतो. त्यांच्या परंपरा, संस्कृती, रूढी, भाषा आणि जीवनपद्धती जपतो.

**"जे लोक विशिष्ट प्रदेशात प्राचीन काळापासून राहतात व त्यांचे निसर्गाशी अतूट नाते संबंध असतात तो लोकसमूह म्हणजे आदिवासी (जनजाती) होय. आर्थात आशा समूहला आदिवासी समाज असे म्हणतात."**

**आदिवासी समाजाची वैशिष्ट्ये** :

**१. निसर्गाच्या सानिध्यात :**

आदिवासी समाज हा जंगल,डोंगर- दऱ्या मध्ये वास्तव्य करणारा असून त्यांची उपजीविका ही शेती, शिकार,मासेमारी व वनउत्पादने यावरअवलंबून आहे.आजही ते आधुनिक युगापासून खुप दूर आहेत.

**२. स्वतंत्रबोली भाषा :**

जसे; गोंडी भाषा, भीली भाषा, संथाली भाषा आशा विविध भाषा बोलल्या जातात.

**३. संस्कृती आणि लोकपरंपरा :**

आदिवासी समाजाची जीवन पद्धती ही निसर्गाला जोडलेली असून तीच त्यांची संस्कृती बनलेली आहे. नृत्य व गाणी- सन, उत्सव, लग्न, समारंभ, शिकार, शेती ई. प्रसंगी ढोल, नगारा, तुंब ई. वाद्यासह गाणी गाऊन नृत्य केले जाते. सण-उत्सव, समारंभ - आदिवासी समाजात वर्षभर (मोसम) ऋतू प्रमाणे सन-उत्सव साजरे केले जातात. देव-देवता -

आदिवासी समाजाची श्रद्धा ही निसर्गपूजेशी निगडीत आहे.

**४. समाज रचना : (सामुहीक (समूह) जीवन शैली ) :**

**“आदिवासी समाज हा संघटीत (समूहाने, जामावात, टोळी, कुळ) राहणारा असून सामुहीक मालकी आणि सामुहीक श्रम हे समाजाचे प्रमुख वैशिष्ट्ये आहे.” त्यांचे न्याय-निवाडे व निर्णय स्वतंत्र पंचायत मध्ये घेतले जातात.**

महाराष्ट्रामध्येभील, वारली, कोळ, गोंड, महादेव कोळी, थकूर, कातकरी, पारधीयाआदिवासी जाती आढळून येतात.

**५. शैक्षणीक व आर्थिक मागासलेपण:**

आदिवासी समाज आधुनिक (प्रगत) समाजापासून खूप दूर आणि शिक्षण सुविधा व रोजराचाआभाव यामुळे तो सर्वच क्षेत्रातमागास आहे.

**६. आदिवासी समाज व शेती :**

संपूर्ण आदिवासीसमाजाव त्यांचे जीवननिसर्गाशी 100 % घट्ट जोडलेले असून . त्या समाज्याच्या उपजीविकेचे प्रमुखसाधन म्हणजेवन (जंगल), शिकार, मासेमारी व शेतीहे आहे.शेती हे केवळ उपजीविकेचे साधन नाही तर ती धार्मिक आणि सांस्कृती परंपरा आहे. जसे- शेती (कसतेवेळी) करताना म्हणजेच पेरणी आगोदर व कापणी वेळी त्यांच्या देव-देवतांची पूजा-आर्च्या करणे आणि निसर्ग,देव-देवतांना पशु बळी देणे आशा परंपरा आसत.

**शेतीचे वैशिष्ट्ये :**

**१. झूम शेती [ Jhum ( Shifting ) Cultivation]:**

**जंगल जाळून राखेत तयार केलेली व काही वर्षा नंतर एका ठिकाणहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित समूहाने केलेली शेती म्हणजे झूम शेती होय.**

**२. संपूर्ण शेतीपावसावर अवलंबून होती :**

साठी सिंचन सुविधाचाअभाव असल्याने शेती प्रामुख्याने पावसावरअवलंबून आहे.

**३.पिकाचे स्वरूप :**

शेतीमध्ये प्रामुख्याने धान्य (कडधान्य) आणि ज्वारी, बाजरी, कोदो, नाचणी, मका व तांदूळ यांसारखी पिके घेतली जात.त्याचबरोबर डाळी व तेलबिया अशी पूरक पिके घेतली जात.

**४. स्थानिक बियाणाचा उपयोग:**

आदिवासी समुदाय स्थानिक जातींची बियाणे परंपरागत पद्धतीने निवड व जपणूक करून वापरत आसत.रासायनिक खते आणि कीटकनाशके यांच्या वापरा शिवाय शेती केलीजायची.

**५. कृषीपूरक लघु –कुटीर उद्योग :**

शेतीसोबत जनावरे, जसे-शेळया, डुकरं, कोंबड्या यांचेपालन करून त्यांचा उपयोग शेतीकामासाठी, अन्न व अर्थप्राप्तीचे आवश्यक साधन म्हणून करत आसत. हेच त्यांचे कृषी पूरक उद्योग होय.

**६.जमिन / जंगल ई.ची मालकी:**

जमीची मालकी सामूहिक स्वरुपाची असायची त्यामुळे जमिनी मधील कामे सर्व समाज मिळून करत असे. जसे - पेरणी, कापणी ई.

**शेतीसमस्या :**

सततची जंगल तोड त्यामुळे सुपीकतेत होणारी घट, सिंचनसुविधा, नवीन बियाण, रासायनिक खाते,आधुनिक तंत्रज्ञान आणि किमान आवश्यक भांडवल, कीटक नाशक, कुंपण अभावामुळे कीटकांचा ई. चा अभाव असल्यामुळे आणि संपूर्ण शेती पावसावरअवलंबून असल्याने अत्यल्प उत्पादकता मोठी समस्या आहे.

**निष्कर्ष :**

आदिवासी समाजचे जंगलाती वास्तव्य आणि पूर्णतः शेतीवर अवलंबित्व, शिक्षणाचा अभाव, अज्ञान, अंधश्रद्धा, प्रगत समाजापासून दूर असल्याने सर्वच बाजूने विशेषतः सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात मागास आहे.

**आदिवासी समाजाची सध्य स्तिथी :**

**१. आर्थिक स्तिथी :**

उत्पन्नाचे प्रमुख साधन शेती हेच असल्यामुळे सततची जंगल तोडीमुळे जमीनीच्या सुपीकतेत होणारी घट, सिंचन सुविधा, नवीन बियाणे, रासायनिक खाते, आधुनिक तंत्रज्ञान, किमान आवश्यक भांडवल,सावकारी, कीटक नाशक, कुंपण ई. चा समस्याअसल्यामुळे आणि संपूर्ण शेती पावसावरअवलंबून असल्याने अत्यल्प उत्पादकता,अत्यल्प उत्पन्न त्यामुळे दारिद्रय,अज्ञान, अंधश्रद्धा अश्यासमस्या आहेत.

**२.शिक्षण :**

शासकीय आणि काही थोड्या स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नांमुळे थोड्या प्रमाणात शिक्षण त्यांच्या पर्यंत पोहोचल्या सारखे दिसते. परंतु आवश्यक शिक्षण सुविधाचा अभाव, निरक्षरता,गरिबी, दारिद्र्य, बेरोजगारी,आरोग्याच्या सुविधा ई. समस्या प्रचंड प्रमाणात दिसून येतात. परिणामी निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे.

**३. सांस्कृती:**

आधुनिकता शिक्षण, रोजगार स्वरूप, विविध धर्मांची ओळख, शहरीकरण व जागतिकीकरणाच्या युगात त्यांच्या भाषा, कला व परंपरा हळूहळू लोपपावत आहेत.बाह्य संस्कृतीचे अनुकरण वाढत आहे. परंतु इत्तर ( सामाजिक,आर्थिक,राजकीय ) लाभ आणि सोई पासून आदिवासी समाज आणखी खूप लांब आहे.

**४. आधिकार आणि हक्क :**

शासन स्तरावर विविध कायदे करून आदिवासी समाजाचे अधिकार आणि हक्क जोपासण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. जसे; जंगल हक्क कायदा, अनुसूचित जमातीसाठी आरक्षण व संरक्षण कायदा ई.द्वारे त्यांचे हक्कजोपासण्याचाअपुराप्रयत्न केला जातआहे. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांची भूमिआणि हक्क विविध पद्धतीने (जसे - वेगवेगळ्या खनिज खाणी , औद्योगिक वसाहत ई. ) हिराहून घेवून त्यांचे आर्थिक,सामाजिक व सांस्कृतिक शोषणा केले जात आहे. यामुळे विस्थापीत झालेल्यांच्यासमस्यात कायम वाड होत आहे.

उदा. :-“ मणिपूर मध्ये आदिवासी स्त्रियांची नग्न धिंड काढली ” हा सामाजिक, सांस्कृतिक शोषणाचा प्रकार आहे. आदिवासी समाज्याची सध्य परिस्थिती समजून घेण्यासाठी ही घटना पूरेशी आहे. या बाबत माहिती वेगवेगळ्या बातम्या व समाज माध्यमा द्वारे प्राप्त झालेली आहे.

**निष्कर्ष**:

**“आदिवासी समाज आधुनिक युगापासून दूर असल्याने अत्यल्प उत्पन्न,निरक्षरता, गरिबी, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रद्धा ई.मुळे आर्थिक,समाजक,राजकीय दृष्ट्या मागास आहे.”**

**भविष्यातील सुधारणा :आदिवासी समाज** :

**१. शाश्वत विकाससाध्य करणे:**

A] आदिवासींचे जीवनमान सुधारण्यासाठीआवश्यक शिक्षण सुविधा, पुरेशा आरोग्य सुविधा, आवश्यक रोजगार संधी व पायाभूत सुविधा उपब्ध करून देणे गरजेचे आहे.

B] सामाजिक,आर्थिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये आदिवासींनां पुरेस प्रतिनिधित्व मिळवून देण्यासाठी विषेश (आवश्यक आरक्षण देवून) प्रयत्न करणेआवश्यकआहे. तरच आदिवासी समाज विकासाच्या मुख्य प्रवाहात येऊ शकेल.

**२. शेती/जंगल आणि आदिवासी समाज :**

आदिवासी समजजीवन पूर्णतः जंगल / शेतीशी निगडीत असून यावरच आवलंबून आसल्यामुळे त्यातमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.जसे :-

A ] आदिवासींना त्यांच्या जमीनी / जंगले ई.ची मालकी ( कायम ) कायदेशीर देणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्यांची आर्थिक,सामागिक,राजकीय प्रगती शक्य नाही.

B] उत्तम शिक्षणाची व्यवस्था, पायाभूत सुविधा ( दाळण-वळण), औद्योगिकीकरण ई.निर्माण कराव्या लागतील.

**३.सामाजिक न्याय** :

आदिवासी समाज विकासाच्या मुख्य प्रवाहातआणण्यासाठी सामाजिक समता / समानता प्रस्थापित करूनआर्थिकउन्नती करावीलागेल त्यासाठी शासन स्तरावर प्रभावी उपाययोजना कराव्य लागतील.आर्थिक,सामागिक,राजकीय क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून द्यावी लागेल.

**४. तंत्रज्ञानाच उपयोग :**

आदिवासी समाज परिवर्तनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच उपयोग आवश्यक आवश्यक आहे. जसे: - ट्रॅक्टर, नांगर, खत, फवारणी यंत्र, रासायनिक खते, कीटकनाशके, धरणे, विहिरी, ट्यूबवेल, शेततळे, ठिबक शिंचन सुविधा,बियाणे व खत अनुदान, (भांडवल) कर्ज,शेती उत्पादणासाठी थेट बाजारपेठ तांत्रिक ज्ञान तसेचकृषी विभागाच्या विविध योजना उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

**आदिवासी समाजाचा शाश्वत विकास साध्य करण्यासाठी वरील उपाय-योजना करणे गरजेचे आहे.**

**संदर्भ :**


1. **महाराष्ट्रातील आदिवासी समाज जीवन** – डॉ . देविदास खोदेवाड
2. **आदिवासी समाजाचे समाजशास्त्र** .के .बी .डॉ- खडसे
3. **आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक समस्या**भगवतः शंकर महाले-
4. **Tribal Economy, Culture and Society in India**- Nilkantha Panigrahi
5. **A Memorandum on the Adivasi Problems in Central Tribal Belt of India and Their Permanent Solutions**- Nirmal Minz (1968)
6. **The Industrial Parish**- Nirmal Minz (1960)
7. **This Fissured Land: An Ecological History of India**- Madhav Gadgil & Ramachandra Guha